| MHKO070014932014 | रे.क.नं.२५५/२०१४<br>सुनिल भुपाल कुरणे वगैरे<br>विरुध्द<br>पंडित रुकाप्पा कुरणे वगैरे |
| --- | --- |

नि.क्र.५४ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा वादीतर्फे वारस यांनी वादी क्र.३ चे वारस रेकॉर्डवर घेणेस परवानगी मिळणेविषयी दाखल केलेला आहे.

०२. वादी यांनी त्यांचे अर्जात असे कथन केले आहे की, प्रस्तुत कामातील वादी क्र.३ विजय भुपाल कुरणे हे दि.२९/०६/२०२१ रोजी मयत झालेले आहेत. अर्जात नमुद प्रमाणे वारस रेकॉर्डवर घेणे गरजेचे आहे. सबब, अर्ज मंजूर करणेविषयी विनंती वादीतर्फे करण्यात आलेली आहे.

०३. विरुध्द बाजूने प्रतिवादीतर्फे नि.क्र.५५ वर त्यांचे म्हणणे देवुन असे कथन केले आहे की, वादी यांचा प्रस्तुतचा नि.क्र.५४ चा अर्ज खोटा व लबाडीचा असुन मान्य व कबुल नाही. वादी क्र.३ हे ता.२९/०६/२०२१ रोजी मयत झालेले आहेत. २०२५ साली प्रस्तुतचा अबेटमेंट सेट व विलंब माफीचा अर्ज दिलेला आहे. अर्ज कलम २ मधील मजकुर जसे की, सुनिल व मिलींद हेच प्रकरण पाहत असल्याने वैयक्तीक अडचणी व आजरपणामुळे वकीलांना भेटुन माहिती देणे शक्य झाले नाही हे कारण संयुक्तीक व कायदेशीर नाही. अर्ज कलम ३ मधील मजकुर धादांत खोटा व लबाडीचा आहे. सदरचा नि.क्र.५४ च्या अर्जामध्ये वारस रेकॉर्डवर घेणेकरिता योग्य व कायदेशीर कारण दिलेले नाही. वादी क्र.३ चे वारस रेकॉर्डवर आणणेकरिता १५४८ दिवस म्हणजेच ३ वर्षे १४ महिने २७ दिवसांचा विलंब झालेला आहे. इतक्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तीक व कायदेशीर कारण सदर अर्जामध्ये नमुद केलेले नाही. सबब न्यायाच्या हेतुस्तव वरील कारणांचा विचार करुन नि.क्र.५४ चा अर्ज नामंजुर करण्यात यावा, जर मे. कोर्ट सदरचा

अर्ज मंजुर करण्याच्या निर्णयापर्यंत आल्यास वादीवर heavy cost करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

०४. वादींनी प्रस्तुतचा दावा हा वाटपाचा व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. दावा हा स्थावर मिळकतीबाबत आहे. वादी क्र.३ चे मृत्यू प्रमाणपत्र हे नि.क्र.५१ ला दाखल आहे. वादी क्र.३ चे वारस म्हणून त्यांना दावा चालविणेचा अधिकार असलेने दावेत त्यांना तांत्रीकदृष्टया मयत वादी क्र.३ च्या समोर रेकॉर्डवर घेणे न्यायाचे हेतुस्तव आवश्यक आहे. प्रस्तुतचा दावा हा गुणदोषावर निकाली निघणे हे अत्यंत आवश्यक आहे. वादीतर्फे वारसांनी नि.क्र.५२ व ५३ ला वादी क्र.३ विरुध्द त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला विलंब माफ होवुन मिळणेकामी व वादी क्र.३ विरुध्द अबेटमेंट सेट असाईड होणेसाठी अर्ज दाखल केलेले आहेत. नि.क्र.५३ वरील अर्ज हा खर्चासह मंजुर करण्यात आलेला आहे. त्यामुळे अर्जातील कथन व कारण पाहता प्रस्तुतचा अर्ज हा मंजुर होण्यास पात्र आहे. करिता खालील आदेश पारीत करण्यात येतो–

**– आदेश –**

१. प्रस्तुतचा अर्ज (निशाणी क्र.५४) हा नि.क्र.५३ वरील खर्चाची पुर्तता झाल्यास मंजुर समजण्यात यावा.

२. नि.क्र.५२ व ५३ वरील आदेश या आदेशासोबत वाचण्यात यावेत.

३. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE

Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2026.01.01 17:38:39 +0530

दि.०१/०१/२०२६
जयसिंगपूर.

**(अ. त्रिं. मनगिरे)**
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
जयसिंगपूर ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Sou. P. S. Musale |
| Name of Court | Jt.C.J.J.D.& J.M.F.C., Jaysingpur. |
| Date of Dictation. | 01/01/2026. |
| Judgment/order signed by the PO on | 01/01/2026. |
| Judgment/order uploaded on | 01/01/2026. |